Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date: 21 November 2024

Time: 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: २१ नोव्हेंबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.**

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी तीन दिवसांच्या गयाना दौऱ्यावर असून, ते आज गयानाच्या संसदेला संबोधित करतील. तसंच ते गयानातल्या भारतीय समुदायाशी संवाद साधणार आहेत. आरोग्य, कनेक्टिव्हिटी, अक्षय ऊर्जा आणि पाणी या क्षेत्रात भारताची गयानासोबत दीर्घकालीन भागीदारी आहे.

तत्पूर्वी आज पंतप्रधान मोदी आणि ग्रेनाडाचे पंतप्रधान डीकॉन मिशेल यांनी दुसऱ्या भारत- कॅरीकॉम शिखर परिषदेचं सह-अध्यक्षपद भुषवलं. कोविड किंवा नैसर्गिक आपत्ती, क्षमता निर्माण किंवा विकास यांसारख्या मुद्द्यांवर भारत कॅरिकॉम सदस्य देशांसाठी एक विश्वासार्ह भागीदार म्हणून उदयाला आला असल्याचं पंतप्रधान यावेळी म्हणाले.

दरम्यान, मोदी यांनी काल जॉर्जटाऊन इथं गयानाचे राष्ट्रपती मोहमद्द इरफान अली यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली. यावेळी उभय देशांदरम्यान आरोग्य, हायड्रोकार्बन, कृषी यासह अन्य क्षेत्रात सामंजस्य करार करण्यात आले.

****

प्रधानमंत्री गतिशक्तिच्या नेटवर्क प्लॅनिंग समूहाने एकूण १५ लाख ८९ हजार कोटी रुपयांच्या २२८ पायाभूत प्रकल्पांचं मूल्यमापन केलं. पंतप्रधान मोदी यांनी २०२१ मध्ये या योजनेची सुरुवात केली होती. दळणवळण विषयक आखणी करताना त्यात परस्पर अनुरूपता आणि सहक्रिया निर्माण व्हावी या हेतूनं या योजनेची सुरुवात करण्यात आली होती. उद्योग आणि अंतर्गत व्यापार वृद्धी विभागाचे अतिरिक्त सचिव राजीव सिंग ठाकूर यांनी काल नवी दिल्लीत बातमीदारांना ही माहिती दिली.

****

प्रतिरोधक संसर्गासाठी असलेल्या नॅफिथ्रोमायसिन या पहिल्या स्वदेशी प्रतिजैविक औषधाचं अनावरण, केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉ जितेंद्र सिंग यांनी काल

नवी दिल्ली इथं केलं. जगभरात दरवर्षी २० लाखांहून अधिक मृत्यूला कारणीभूत असणाऱ्या औषध- प्रतिरोधक असलेल्या न्यूमोनिया आजाराविरूद्ध, नॅफिथ्रोमाइसिनची तीन दिवसीय उपचार पद्धती उल्लेखनीय ठरेल, असं सिंग यांनी यावेळी सांगितलं.

****

राज्य विधानसभेच्या निवडणुकीसाठी काल सरासरी ६५ पूर्णांक ११ शतांश टक्के मतदानाची नोंद झाली. राज्यात सर्वाधिक ७६ पूर्णांक २५ टक्के मतदान कोल्हापूर जिल्ह्यात झालं, तर सर्वात कमी ५२ पूर्णांक सात दशांश टक्के मतदानाची नोंद मुंबई शहरात झाली. नांदेड लोकसभा मतदारसंघातल्या पोटनिवडणुकीसाठी काल ६२ पूर्णांक ८९ टक्के मतदान झालं. झारखंडमध्ये काल दुसऱ्या टप्प्यात ६८ पूर्णांक ४५ टक्के मतदान झालं. महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा निवडणुकीसह इतर राज्यातल्या विधानसभा पोटनिवडणूक आणि लोकसभा पोटनिवडणूकीत झालेल्या मतदानाची मोजणी परवा २३ तारखेला होणार आहे.

****

राज्यात काल बहुतांश ठिकाणी शांततेत मतदान झालं तरी मर्यादित ठिकाणी गैरप्रकार झाले. निवडणूक प्रक्रियेत अडथळा आणणाऱ्यांवर प्रशासन आणि पोलिसांनी कारवाई केली. नाशिक जिल्ह्यातल्या नांदगाव मतदारसंघातले शिवसेनेचे उमेदवार सुहास कांदे यांनी अपक्ष उमेदवार समीर भुजबळ यांना जीवे मारण्याची धमकी दिली. कांदे यांनी मतदारांना एका बसमध्ये बसवून मतदान केंद्रावर आणल्याबद्दल भुजबळ यांनी आक्षेप घेतल्यानंतर हा वाद झाला.

बीड जिल्ह्यातल्या परळी मतदारसंघातल्या घाटनांदूर, चोथेवाडी, मुरंबी, जवळगाव या गावांमध्ये मतदान केंद्रावर मतदान यंत्रांची तोडफोड झाली, याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेसने परस्परांवर आरोप केले आहेत.

****

मेळघाटातल्या रंगुबेली, खामडा - किन्हीखेडा, धोकरा, कुंड आणि खोकमार या गावातल्या नागरिकांनी विधानसभा निवडणुकीवर बहिष्कार घातला. रस्ते, वीज आणि शुद्ध पिण्याचे पाणी या समस्या प्रशासन आणि लोकप्रतिनिधी सोडवू शकले नाहीत. त्यामुळे मागण्या पूर्ण होईपर्यंत मतदान होणार नाही, असा निर्णय इथल्या ग्रामस्थांनी घेतला आहे. त्यामुळे या गावांमध्ये शून्य टक्के मतदान झालं.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या कन्नड तालुक्यातल्या रामनगर गावातल्या ग्रामस्थांनीही पायाभूत सुविधांच्या अभावामुळे मतदानावर बहिष्कार घातल्याचं वृत्त आहे.

****

निवडणुकीमध्ये पैसे उपलब्ध करून देण्यासाठी बिटकॉईन या क्रिप्टोकरन्सीचा अवैध वापर करण्यात, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या नेत्या सुप्रिया सुळे यांचा सहभाग असल्याचा आरोप, भारतीय जनता पक्षानं पुन्हा एकदा केला आहे. भाजपचे प्रवक्ते संबित पात्रा यांनी काल नवी दिल्लीत पत्रकार परिषद घेऊन या प्रकरणाचा तपास व्हावा, अशी मागणी केली आहे. बिटकॉईनद्वारे सुमारे दोनशे पस्तीस कोटी रुपयांचा घोटाळा करण्यात आल्याचा आरोप पात्रा यांनी केला.

दुसरीकडे, माध्यमांना हाताशी धरून भाजप आपल्यावर क्रिप्टो करन्सीच्या बाबतीत खोटे आरोप करत असल्याचं नाना पटोले यांनी म्हटलं आहे.

****

विधानसभा निवडणुकीसाठी आचारसंहिता लागू झाल्यापासून राज्यभरातून ७०४ कोटी ७१ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यात २८४ कोटी रुपये किमतीचे मौल्यवान धातू, १६० कोटी रुपये रोख, १११ कोटींचा इतर मुद्देमाल, ७५ कोटी रुपये किमतीचं मद्य आणि ७३ कोटी रुपयांचे अंमली पदार्थ, यांचा समावेश आहे.

****

विदर्भ, मराठवाड्यासह मध्य महाराष्ट्रात थंडी वाढली असून, तुरळक ठिकाणी किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत काहीशी घट झाली आहे. सर्वात कमी किमान तापमान काल पुण्यात १२ पूर्णांक दोन अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं.

****